लोकसत्ता पू.पान क्र.1

दि.10/03/2023

# सर्वधर्मीय दफनभूमीच्या कामाला स्थगिती

## दफनविरोधी आंदोलन मागे

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसईच्या सनसिटी येथील सर्वधर्मीय दफनभूमी विरोधात गुरूवारी हिंदुत्ववादी संघटनेने पुकारलेले आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. पालिकेने या कामाला ३१ मार्चपर्यंत स्थगिती दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आल्याचे संघटनेने सांगितले. पालिकेने मात्र ठेकेदाराच्या देयकासंबंधीच्या तांत्रिक अडचणीमुळे काम थांबल्याचे सांगितले आहे.

वसईत बांधण्यात येणारी सर्वधर्मीय दफनभूमी वादात सापडली आहे. या जागेवर मुस्लिमांची दफनभूमी नको, अशी मागणी करत विविध हिंदुत्ववादी संघटनांनी विरोध केला आहे. नुकताच सकल हिंदू समाजाने या दफनभूमीच्या विरोधात मोर्चा काढून विरोध दर्शवला होता. यामुळे दफनभूमी वादात सापडली होती. पालिकेने या दफनभूमीच्या कामासाठी सर्व परवानग्या घेतल्या होत्या. पालिका आपल्या निर्णयावर ठाम होती. त्यामुळे सकल हिंदू समाजाच्या वतीने गुरूवारी पालिका मुख्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात होते. यामुळे पेच निर्माण झाला होता.

संघटनेशी झालेल्या चर्चेनंतर पालिकेने ३१ मार्चपर्यंत या कामाला स्थगिती दिल्याची माहिती संघटनेच्या प्रवक्त्यांनी दिली. कामाला स्थगिती असल्यामुळे गुरूवारी पालिका मुख्यालयावर आयोजित आंदोलन मागे घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले.

पालिकेने मात्र संघटनेमुळे नाही तर तांत्रिक अडचणींमुळे स्थगिती दिल्याचे सांगितले आहे. या दफनभूमीचे काम महावीर एण्टरप्रायझेस या ठेकेदाराला देण्यात आले आहे. त्याच्या देयकासंदर्भात तांत्रिक अडचणी असल्याने काम थांबले असल्याचे पालिकेने सांगितले.

### विरोध का?

विविध हिंदूत्ववादी संघटनांनी ४ मुद्यांवरून या दफनभूमीला विरोध केला होता. हिंदू बहुल वस्तीत मुस्लिम धर्मीयांची दफनभूमी नको अशी प्रमुख मागणी आहे. ही जागा पाणथळ असल्यामुळे पर्यावरण विभागाला ना हरकत प्रमाणपत्र देण्याचा अधिकार नाही, असा संघटनांचा दावा आहे. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने १४ ऑक्टोबर २०१३ रोजी आदेश देऊन न्यायालयाच्या निर्णयाशिवाय बांधकाम करता येणार नाही, असे निर्देश दिले होते. या बांधकामांविरोधात राष्ट्रीय हरित लवादाकडे नव्याने याचिका दाखल करण्यात आली होती. त्याची सुनावणी ३१ मार्च रोजी होणार आहे. तोपर्यंत या दफनभूमीच्या कामाला स्थगिती द्या, अशी या संघटनांची मागणी होती.



सकाळ पान क्र.3

# 'पोलिसांना आठच तास काम द्यावे'

मुंबई, ता. ९ : पोलिसांवर कामाचा अतिताण आहे. ही बाब लक्षात घेता त्यांच्या कामाचे तास कमी करून आठ तास करण्याची मागणी ॲड. माधवी अय्यपन यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिकेद्वारे केली. त्यांच्या याचिकेवर आज सुनावणी झाली. १९९५ मध्ये न्या. बी. एन. श्रीकृष्ण यांनी दिलेल्या अहवालात पोलिसांना कामाचे तास, त्यांची शारीरिक आणि मानसिक अवस्था आणि तंदुरुस्ती याबाबत शिफारशी सुचवण्यात आलेल्या आहेत. तसेच पोलिसांच्या कामाचे आठ तास असावेत, असेही म्हटले आहे. आठ तासांच्या नियमाला अद्याप राज्य सरकारने हिरवा कंदील दिलेला नाही. कामाच्या वाढत्या ताणामुळे पोलिसांवर परिणाम होत आहे. तसेच कौटुंबिक आणि व्यक्तिगत आयुष्यावर त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे या शिफारशींची दखल घेण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाने याचिकेवरील पुढील सुनावणी १८ एप्रिल रोजी निश्चित केली आहे. तसेच याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश राज्य सरकार आणि प्रतिवादी पक्षांना दिले आहेत.

लोकमत पू.पान क्र.3

# शिंदे - ठाकरे गटांची अंतर राखून शिवजयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या नवघर मार्ग, स्नेहा गल्ली नाक्यावर शिवजयंती साजरी करण्यावरून शिवसेनेच्या शिंदे व ठाकरे गटांतील वाद अखेर संपुष्टात येऊन आता दोन्ही गट त्याच ठिकाणी उद्या, शुक्रवार, १० मार्च रोजी वेगवेगळी शिवजयंती साजरी करणार आहेत.

स्नेहा गल्ली नाक्यावर १० मार्च रोजी शिवजयंती साजरी करण्यावरून शिंदे व ठाकरे गट आमने-सामने आले होते. शिवसेनेच्या वतीने येथे शिवजयंती साजरी केली जाते. यंदा ठाकरे गटाच्या महिला उपजिल्हा संघटक जयलक्ष्मी सावंत व उपशहर प्रमुख राजाराम सावंत यांनी शिवजयंतीसाठी पहिला अर्ज नवघर पोलिस, महापालिका, वाहतूक पोलिस यांना दिला होता. नवघर पोलिस व वाहतूक शाखेने ठाकरे गटास नाहरकत दिली होती. केवळ पालिकेची परवानगी बाकी असताना शिंदे गटाचे विभागप्रमुख संतोष धामणकर यांनी आक्षेप घेतला. त्यामुळे पोलिसांनी ठाकरे गटाच्या परवानगीच्या निर्णयावर फेरविचार सुरू केला. पालिकेने परवानगी प्रलंबित ठेवली होती. नवघर पोलिस ठाण्यात दोन्ही गटांच्या बैठका पोलिस घेत होते. सहायक पोलिस आयुक्त शशिकांत भोसले व वरिष्ठ निरीक्षक मिलिंद देसाई यांनी दोन्ही गटांची बैठक पोलिस ठाण्यात घेतली. पोलिसांनी दोन्ही गटांची समजूत काढली. प्रभाग अधिकारी प्रभाकर म्हात्रेदेखील उपस्थित होते. दोन्ही गटांस पूर्वीप्रमाणेच एक शिवजयंती साजरी करण्याचा पर्याय सांगितला असता तो फेटाळून लावण्यात आला. दोघांनीही ठरावीक अंतर सोडून शिवजयंतीसाठी १० बाय १० फुटांचे मंडप उभारायचे असे ठरले. दोन्ही गटांनी त्यास मान्यता दिल्यावर पोलिस व पालिका अधिकारी यांनी प्रस्तावित कार्यक्रमाच्या ठिकाणी जाऊन पाहणी करून जागा निश्चित केली.

### प्रतिबंधात्मक कारवाईची नोटीस बजावणार?

शिवजयंती साजरी करताना दोन्ही गटांत वाद होऊ नये म्हणून त्यांना पोलिसांकडून प्रतिबंधात्मक कारवाईची नोटीस बजावली जाण्याची शक्यता पोलिस सूत्रांनी बोलून दाखवली. वर्दळीच्या रस्त्यावर १० बाय १० चा मंडप टाकून शिवप्रतिमा पूजनाचा कार्यक्रम असताना दोन्ही गटांनी निदान शिवजयंती अशी वेगवेगळी साजरी न करता एकत्रित साजरी करणे अपेक्षित होते, अशी भावना परिसरातील रहिवाशांनी बोलून दाखवली.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. 10/03/2023

पुण्यनगरी पृ. पान क्र.1

# कचरा गाडीतील सांडपाण्यामुळे अपघाताचे सत्र सुरूच

## दुचाकी चालकांचा जीव धोक्यात



।मीरा रोड। मीरा-भाईंदर शहरात दररोज जमा होणारा घनकचरा उत्तन येथील डम्पिंग ग्राऊंडमध्ये वाहून नेला जातो. तो घेऊन जाताना गाड्यातून चिकट पदार्थ आणि सांडपाणी रस्त्यावर सांडले जाते. या चिकट सांडपाण्यामुळे दुचाकी घसरून अपघाताचे प्रमाण वाढले आहे. वारंवार असे प्रकार सुरूच आहेत. याकडे मनपा अधिकारी व पोलीस दुर्लक्ष करत असल्यामुळे दुचाकीचालकांचा जीव धोक्यात आहे.

मीरा-भाईंदर शहरात दैनंदिन जमा होणारा कचरा उत्तनच्या धावगी डोंगर येथील घनकचरा प्रकल्पामध्ये वाहून नेण्यासाठी ठेकेदाराला कंत्राट देण्यात आले आहे. ठेकेदार हा गेल्या अनेक वर्षांपासून जुन्या झालेल्या गाड्या वापरत आहे.

या जुन्या गाड्यांमुळे अनेकवेळा गाड्यांचेदेखील अपघात होत आहेत. या जुन्या व मुदतबाह्य झालेल्या गाड्यांमध्ये भरण्यात येणारा ओला कचरा थेट रस्त्यावर पडतो. मंगळवारी सकाळच्या सुमारास अनेक दुचाकी रस्त्यावर पडलेल्या पाण्यावरून घसरून अपघातग्रस्त झाल्याचे दिसून आले. दुचाकी घसरून पडत असल्याची माहिती अग्निशमन दलाला दिल्यानंतर अग्निशमन दलाने सांडपाणी पडलेला रस्ता पाण्याच्या फवाऱ्याने धुऊन काढला. कचरा गाड्यातील सांडपाणी रस्त्यावर पडणार नाही, याची महापालिकेसह पोलीस व वाहतूक शाखेने दक्षता घ्यावी व या गाड्यांवर तत्काळ कारवाई करून खराब व तुटलेल्या गाड्यांची दुरुस्ती करण्याचे निर्देश ठेकेदाराला देण्यात यावेत तसेच चिकट सांडपाणी रस्त्यावर पडणाऱ्या गाड्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी माजी नगरसेविका शर्मिला बगाजी यांनी केली आहे.

सकाळ पृ. पान क्र. 3

# विरारमध्ये आजपासून भव्य शिवोत्सव

वसई, ता. ९ (बातमीदार) : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित असलेला शिवोत्सव कार्यक्रम विरार पश्चिम येथील विराट नगर मैदान येथे आयोजित करण्यात आला आहे. या वेळी यशवंतनगर अमेय क्लासिक क्लबपर्यंत मिरवणूक काढण्यात येणार आहे. शिवोत्सवाचा उद्‌घाटन सोहळा शुक्रवारी (ता. १०) सायंकाळी ४ वाजता होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. या वेळी मुग्धा लेले, ग्रीष्मा पाटील, स्थायी समितीचे माजी सभापती संदेश जाधव, अजीव पाटील, माजी महापौर राजीव पाटील उपस्थित होते.

शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता शालेय विद्यार्थ्यांकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील नाट्य सादर करण्यात येणार आहे. शनिवारी (ता. ११) इतिहासतज्ज्ञ आप्पा परब, सौरभ कर्डे यांचे व्याख्यान, प्रणय शेलार व आलीम यांच्यातर्फे मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर केले जाणार असल्याची माहिती या वेळी ग्रीष्मा पाटील यांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातील प्रसंगांवर आधारित स्थानिक कलाकारांनी साकारलेल्या रांगोळ्या, शत्रूशी युद्ध करताना कोणत्या युद्ध साहित्याचा वापर शिवरायांनी केला, ते साहित्य कसे होते, त्यांचे प्रत्यक्ष दर्शन रसिकांना होणार आहे. त्यात विविध तलवारी, भाले, ढाली, तोफा, तोफगोळे यांचा समावेश असणार आहे. याशिवाय विविध व्याख्याने, पोवाडे, मर्दानी खेळ, नाट्य असे अनेक कार्यक्रम यानिमित्ताने आपल्याला पाहायला मिळणार आहेत, अशी माहिती संदेश जाधव यांनी दिली. इतिहास प्रेमी, दुर्गमित्र व वसईकरांनी शिवोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षिका मुग्धा लेले यांनी नागरिकांना केले आहे.

सकाळ पृ. पान क्र. 2



विरार : महिला पोलिस अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

# वसईत महिला पोलिस अधिकाऱ्यांचा सन्मान

विरार, ता. ९ (बातमीदार) : वसईतील ख्रिस्तीना घोन्साल्विस फाऊंडेशनतर्फे १९ महिला पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना सहायक पोलिस आयुक्त पद्मजा बडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला माजी आमदार डॉमनिक घोन्साल्विस, फादर थॉमस लोपीस आणि पोलिस आयुक्त पद्मजा बडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविक फाऊंडेशनचे अध्यक्ष रोहन घोन्सालवीस यांनी केले. या वेळी २० पोलिस अधिकारी व कर्मचारी यांनी करोना काळात दिलेल्या योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात माजी आमदार डॉमनिक घोन्साल्विस, फादर लोपीस आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बिना डायस यांनी; तर आभार रेखा युरी घोन्सालवीस यांनी मानले.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 10/03/2023

लोकसत्ता पृ. पान क्र. 1



# हिंसक आंदोलनामुळे अतिक्रमणावरील कारवाई स्थगित

## संतप्त नागरिकांची दगडफेक

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** वसईच्या महसूल विभागाने विरारच्या खैरपाडा येथील शासकीय जागेवरील अतिक्रमणावर सलग दुसऱ्या दिवशी कारवाई सुरू केली होती. यावेळी नागरिकांनी हिंसक आंदोलन करून विरोध केला. नागरिकांनी पथकावर जोरदार दगडफेक केली. यामुळे अर्ध्यावरच महसूल विभागाने कारवाई स्थगित केली आहे.

विरार पूर्वेच्या खैरपाडा येथील नालेश्वर नगर परिसरातील सर्व्हे क्रमांक ७/१५, ७/१६ व सर्व्हे क्रमांक ३ या शासकीय जागेवर भूमाफियांनी अतिक्रमण करून बेकायदा चाळी व गाळे उभारण्यात आले होते. बेकायदा चाळीत मागील सहा वर्षांपासून मोठ्या संख्येने नागरिक राहत आहेत. बुधवारपासून वसईच्या महसूल विभागाने शासकीय जागेत असलेले अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केली होती.

पहिल्याच दिवशी १२२ बांधकामे जेसीबीच्या साहाय्याने तोडली होती. गुरुवारी पुन्हा एकदा महसूल विभागाच्या पथकाने उर्वरित कारवाई सुरू केली होती. यावेळी या कारवाईला राहत्या नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला. एका महिलेने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार घडला. यामुळे काही काळ या भागात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या वाढत्या तणावामुळे अखेर महसूल विभागाने माघार घेत कारवाई स्थगित केली आहे.

दुसऱ्या दिवशी जवळपास ३५ बेकायदेशीर बांधकामे तोडली असल्याची माहिती वसईच्या तहसिलदार उज्वला भगत यांनी दिली आहे. तसेच यापुढे पूर्ण पोलीस बंदोबस्त घेऊन उर्वरित पुढील कारवाई लवकरच केली जाणार असल्याचे भगत यांनी सांगितले आहे.

### नागरिकांचा आक्रोश

भूमाफियांनी अनधिकृत बांधकामे करून सर्वसामान्य नागरिकांच्या माथी मारली आहेत. परंतु आता शासकीय जागेवरील अतिक्रमण हटविण्यास सुरुवात झाल्याने अनेक कुटुंबांचे संसार हे उघड्यावर आले आहेत. त्यामुळे कारवाईच्या दुसऱ्या दिवशीही नागरिकांचा आक्रोश पाहायला मिळाला.

> जमलेल्या नागरिकांकडून कारवाई करण्यासाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांवर दगडफेक केल्याचा प्रकार घडला. याशिवाय पोलीस बंदोबस्त व इतर मनुष्यबळही कमी होते. तणाव अधिक वाढू नये यासाठी कारवाई स्थगित केली आहे. - **स्वप्निल तांगडे**, प्रांताधिकारी वसई.

लोकसत्ता पृ. पान क्र. 4

# भाईंदरमध्ये वेश्या व्यवसायावर कारवाई

**वसई :** भाईंदरच्या उत्तन येथील ग्रीन व्हिला या हॉटेलमध्ये सुरू असलेला वेश्याव्यवसाय भाईंदरच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने उघडकीस आणला आहे. यावेळी दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. तर हॉटेल चालक तपन सेन (३२) मुन्नाकुमार सिंग (२७), साहिल इस्लाम (३१), शाहबूल मंडल (३४) यांना अटक करण्यात आली.

CamScanner

Scanned with CamScanner

दि.10/03/2023

पुढारी पृ. पान क्र. 4

# पाकिस्तानी एनिमी प्रॉपर्टीच्या परस्पर व्यवहाराविरोधात राष्ट्रपतींसह पंतप्रधान, गृहमंत्र्यांकडे तक्रार

भाईंदर : राजू काळे

भारतामध्ये असलेल्या पाकिस्तान या शत्रू राष्ट्राची तसेच त्यातील नागरिकाची कोणतीही मालमत्ता परस्पर अथवा केंद्र सरकारच्या परवानगीखेरीज विकता येत नसल्याचे परिपत्रक केंद्र सरकारने १९६८ मध्ये जारी केले आहे. त्याला बगल देत मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील मौजे काशी, मौजे महाजनवाडी व मौजे घोडबंदर येथील ३ हेक्टर ६ एकर जागेचा परस्पर व्यवहार झाल्याचे उघड करून त्याविरोधात गौतम अग्रवाल यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्याकडे तक्रार केली आहे. या प्रकरणाची एनआयए, ईडी व सीबीआय मार्फत सखोल चौकशी करून त्यात गुंतलेल्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

## ईडीने संबंधितांना पाठविल्या नोटिसा

या बेकायदेशीर प्रकरणात काही अधिकाऱ्यांसह जमिनीचा परस्पर व्यवहार करणाऱ्या मेसर्स ए. ए. कॉर्प या बांधकाम कंपनीचे भागीदार मोंटू उर्फ हरीश बाबुलाल अग्रवाल, आनंद अग्रवाल, जोर्डन परेरा, रामप्रकाश अग्रवाल व दिलेश शाह यांचा समावेश असल्याचा आरोप गौतम अग्रवाल यांनी केला आहे. याप्रकरणी ईडी ने संबंधितांना नोटीसा पाठविल्या असून त्या बनावट असल्याचा दावा त्यांनी केला आहे. तर याप्रकरणी ईडीसह सीबीआयकडून चौकशी सुरु असल्याचा दावा करीत राष्ट्रपतींसह पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आदींकडे तक्रार केल्याचे गौतम यांनी सांगितले.

शत्रू राष्ट्रातील एखाद्या नागरीकाची जमीन वा मालमत्ता भारतात असेल तर ती केंद्र सरकारकडे एनेमी प्रॉपर्टी (शत्रू मालमत्ता) म्हणून जमा केली जाते. या मालमत्तेचा व्यवहार केंद्र सरकारच्या परवानगीखेरीज परस्पर करता येत नाही. तसे परिपत्रकच केंद्र सरकारने १९६८ मध्ये जारी केले आहे. त्याला बगल देत मिरा-भाईंदरमधील पाकिस्तानी नागरीकाची एनेमी प्रॉपर्टी परस्पर विकल्याचा प्रकार काही महिन्यांपूर्वी उजेडात आणण्यात आला आहे. याप्रकरणी एनेमी प्रॉपर्टीचा व्यवहार करणाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता न्यायालयाने संबंधितांना ३ कोटी रुपये जमा करण्याचे निर्देश देत ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले. जिल्हाधिकाऱ्यांकडून अद्यापही चौकशी पूर्ण करण्यात आली नसल्याचे तक्रारदार यांनी सांगितले आहे.

जमिनीचे मालक मोईनुद्दीन यांचे पाकिस्तानमधील कराचीमध्ये ६ सप्टेंबर १९७१ रोजी निधन झाले. त्यामुळे त्यांचा वारसदार ठरलेला त्यांचा मुलगा मोहम्मद इम्रान मोईनुद्दीन पटेल याच्या नावे ९ जुलै २००७ रोजी पॉवर ऑफ ॲटर्नी नोंदणीकृत करून देण्यात आली. त्याने केंद्र सरकारच्या एनेमी प्रॉपर्टी विभागाला अंधारात ठेवून मोईनुद्दीन यांची जमीन आसीफ पटेल, रिझवान पटेल, नूर मोहम्मद पटेल, सिकंदर पटेल यांच्याशी संगनमत करून मेसर्स ए. ए. कॉर्प या स्थानिक कंपनीला परस्पर विकली. ७ सप्टेंबर २००७ रोजी त्याचा करारनामा ठाणे येथील उपनिबंधक २ कार्यालयात नोंदणीकृत करण्यात आला होता.

पुढारी पृ. पान क्र.3

## पोलीस आयुक्तालयाकडून क्रिकेट स्पर्धा

मिरारोड : मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाकडून पोलीस व महापालिका अधिकारी यांच्यामध्ये क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे महिला दिनानिमित्त दोन महिला संघाचे सामने खेळवले जाणार आहेत. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामधील पोलीस अधिकारी, कर्मचारी व महापालिका अधिकारी, कर्मचारी यांचे क्रिकेट संघ यामध्ये मिरा भाईंदर महापालिका संघ, वसई विरार महापालिका संघ व मिरा भाईंदर वसई विरार पोलिसांचे सहा संघ तसेच महिला दिनानिमित्त महिलांचे दोन संघ असे सामने खेळवले जाणार आहेत. हे क्रिकेट सामने १० मार्च रोजी सकाळी ८ ते ६ या वेळेत होणार आहेत. या क्रिकेट सामन्यात विजेत्या संघाला पोलीस आयुक्त मधुकर पांडे व मिरा भाईंदर महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्या हस्ते चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. २७ फेब्रुवारी रोजी मनपा कला क्रीडा महोत्सवात मिरा भाईंदर मनपा अधिकारी व पोलीस अधिकारी यांच्यामध्ये झालेल्या क्रिकेट सामन्यात पोलिसांचा संघ विजयी झाला होता.

सकाळ पान क्र.5

## मुलासह आत्महत्या करणाऱ्या महिलेस रोखले

भाईंदर (बातमीदार) : भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणाऱ्या उड्डाण पुलावरून एका महिलेने गुरुवारी सायंकाळी आपल्या दीड वर्षाच्या मुलासह उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. जवळच कर्तव्यावर असलेल्या वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेमुळे मुलासह तिचे प्राण वाचले. महिलेला मुलासह जवळच्या सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास वाहतूक पोलिस सिद्धार्थ भालेराव व गणेश ताटे यांना महिला मुलासह चढून बसली असल्याचे कळले. दोघांनी उड्डाण पुलाच्या दिशेने धाव घेतली; मात्र तोपर्यंत महिलेने उडी मारली होती. मेट्रो मार्गाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी रस्त्यावर पडलेल्या महिलेला व तिच्या मुलाला पोलिसांनी तातडीने जवळच्या भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात दाखल केले. दीड वर्षाच्या मुलाचा पाय फ्रॅक्चर झाला असून महिला सध्या बेशुद्धावस्थेत आहे. तिच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती जोशी रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. जफर तडवी यांनी दिली. महिला मिरा रोड येथे राहणारी आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 10/03/2023

लोकसत्ता पू.पान क्र.1

# विरारमध्ये महिलेची हत्या

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** विरारमध्ये एका मुलाने आईची हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी या मुलाला अटक केली आहे. आरोपी मुलगा हा विक्षिप्त असल्याचे पोलिसांनी सांगितले.

विरारच्या फुलपाडा येथील गांधीनगर परिसरातील वक्रतुंड अपार्टमेंटमध्ये वैशाली धनु (४४) ही महिला मुलगा देवांश (२६) याच्यासोबत राहत होती. देवांश हा एका खासगी कंपनीत काम करत होता. तो विक्षिप्त होता आणि सतत आईशी भांडण करत होता. मंगळवारी रात्री देखील त्याने आईशी भांडण केले होते. त्याची माहिती मयत वैशाली यांनी आईला दिली होती. गुरुवारी दुपारी वैशाली यांची आई घरी आली असता दार कुणी उघडत नव्हते. त्यामुळे तिने विरार पोलिसात धाव घेतली, पोलिसांनी दार उघडले असतात वैशाली यांचा मृतदेह घरातील बेडरूममध्ये होता. आम्ही घरात शिरलो तेव्हा घर अस्ताव्यस्त होते. मुलगा देवांश याने ओढणीच्या साहाय्याने गळा आवळून हत्या केली आणि मृतदेहाजवळ तो विचित्र पद्धतीने दात घासत होता असे पोलिसांनी सांगितले.

पुण्यनगरी पू.पान क्र.1

## वसईत गोदामाच्या आगीत महिलेचा मृत्यू

नालासोपारा । वसईतील सातिवली मोरया नाका येथील रासायनिक गोदामाला गुरुवारी दुपारी ४.३०च्या सुमारास आग लागली. गोदामात ५ ते ६ जण काम करत होते. आगीत दोनजण जखमी, तर एका महिलेचा मृत्यू झाला, अशी माहिती सूत्रांनी दिली. यात आणखी कोण होते का, त्याचा गोदामात शोध सुरू आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी दिलेल्या माहितीनुसार, स्प्रेचा वायू ट्रान्सफर करीत असताना अचानक स्फोट झाला. यात स्वस्तिक कंपनीची मालकीण सुरय्या बानू यांचा जागीच मृत्यू झाला असून, विजय यादव, कमलेश पासवान, दिनेश पासवान अशी जखमींची नावे आहेत. त्यांच्यावर खासगी व सर डीएम पेटीट रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कंपनीकडे कोणताही परवाना, फायर ऑडिट केलेले नव्हते. वसई-विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या विभागाने दोनदा नोटिशी देऊनसुद्धा फायर ऑडिट केलेले नाही. स्प्रे करण्यासाठी लागणारा वायू सिलिंडरमधून ट्रान्सफर करीत असताना अपघात घडल्याचे सूत्रांनी सांगितले.

लोकमत पान क्र.5

## दुचाकीस्वाराचा अपघाती मृत्यू

**नालासोपारा :** नायगावच्या कॉसिटा एनक्लेव्ह येथे राहणाऱ्या अंकित सालीयन (वय २५) या तरुणाचा ६ मार्चच्या रात्री अपघाती मृत्यू झाला आहे. भिवंडी-वसई वाहिनीवरून अंकित दुचाकीवरून जात असताना फ्लोरा गार्डन हॉटेलसमोर भरधाव वेगातील वाहनाने जोरदार धडक देऊन अपघात झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. वालीव पोलिसांनी ७ मार्चला आरोपी वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पान क्र.5

## अल्पवयीन मुलाचा झाडाला गळफास

**नालासोपारा :** चंदनसार येथील देवीपाडा झोपडपट्टीत राहणाऱ्या प्रणय अशोक गौड (वय १६) या अल्पवयीन मुलाने बुधवारी सकाळी गळफास घेतला. त्याने देवीपाडाच्या मागील जंगलामध्ये उंबराच्या झाडाच्या फांदीला गळफास घेतला. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. विरार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 10/03/2023

पुढारी पृ. पान क्र. 2

# जलवाहतुकीमुळे रस्ते, रेल्वेचा भार होणार कमी

## अर्थसंकल्पात ४२४ कोटींची तरतूद; खाडीतील वाहतुकीच्या प्रलंबित कामांना वेग

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

दिवसेंदिवस वाढत्या नागरिकरणाने ठाणे आणि पालघर जिल्ह्यात लोकसंख्येची घनता वाढते आहे. या दोन्ही जिल्ह्यात सतत वाढणाऱ्या नागरिकरणाचा भार दोन्ही जिल्ह्यातील रस्ते आणि रेल्वे वाहतुकीचा ताण असह्य होत आहे. मुंबईला जोडणाऱ्या ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील वाढत्या वाहतूककोंडीचा ताण सुसह्य करण्यासाठी ठाणे आणि वसई खाडीदरम्यान जलवाहतूकीने जोडण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील कल्याण आणि ठाण्यात कामे सूरू झाली आहेत. खाडीतील या जलवाहतूकीला वेग देण्यासाठी राज्य शासनाने गुरूवारी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात सुमारे ४२४ कोटींची तरतूद केली आहे. या तरतुदीमुळे आधी सुरू असलेल्या खाडीतील वाहतुकीच्या प्रलंबित कामांना वेग मिळण्याबरोबच नवीन कामे सुरू होण्यास मदत होणार आहे.

मुंबईला जोडलेल्या ठाणे आणि पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणावर नागरिकरण झाले आहे. या नागरिकरणाचा ताण दोन्ही जिल्ह्यातील रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवर पडतो आहे. त्यामुळे दोन्ही जिल्ह्यातील महानगरांत, छोट्या गावांनाही वाहतूककोंडीचा फटका रोजच बसतो आहे. या वाढत्या वाहतूककोंडीच्या प्रश्नावर जलवाहतूक हा चांगला पर्याय असून त्यादृष्टीने केंद्र आणि राज्य सरकारने २०१५ पासून जलवाहतूकीच्या दृष्टीने पायाभूत कामे सुरू केली आहेत. राज्यातील सत्ता बदलानंतर तत्कालीन ठाकरे सरकार आणि ठाणे महापालिकेने बुलेट ट्रेनच्या भूसंपादनास असहकार्य केल्याने त्याचा फटका कल्याण-ठाणे-वसई आणि कल्याण-ठाणे-मुंबई जलवाहतूक प्रकल्पाला बसला होता, मात्र पुन्हा झालेल्या सत्तांतरानंतर या कामांनी सुरूवात झाली आहे, गुरूवारी राज्याच्या अर्थसंकल्पात या खाडीतील वाहतूकीसाठी नव्याने सुमारे ४२४ कोटींची तरतूद करण्यात आल्याने या जलवाहतूकीच्या कामांना गती मिळण्यास मदत होणार आहे. ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील उपनगरांमधील लाखो चाकरमान्यांचा प्रवास या जलवाहतूकीमुळे सुसह्य होण्यास मदत होईल, अशी आशा व्यक्त होते आहे.

### सागरी किनाऱ्याचा विकास होणार

ठाणे महापालिकेने पुढाकार घेऊन यापूर्वीच जलवाहतूकीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला होता. कल्याण-ठाणे-वसई या पहिल्या टप्प्यासाठी ६५० कोटी मंजूर झाले होते. ठाणे ते वसई जलवाहतूकीमुळे ठाणे, वसई, मीरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली या शहरांना अंतर्गत जलवाहतुकीने जोडली जाणार आहेत. कल्याण-ठाणे-कोलशेत-गायमुख-भाईंदर-वसई अशी प्रवासी जलवाहतूक सुरू होण्यास मदत होणार आहे. त्यासाठी कल्याण, वसई, मिरा भाईंदर, घोडबंदर रोड, भिवंडी, कोलशेत, दिवा, ठाणे येथे जेट्टीची कामे तर गोराई, बोरिवली, वसई व भाईंदर रो-रो वाहतूक प्रस्तावित असून त्यास केंद्र शासनाची सागरमाला योजनेंतर्गत मान्यता यापूर्वीच मिळाली आहे. या वाहतूक सेवेमुळे सुमारे १५० मीटर लांब सीट पिलिंगच्या



माध्यमातून सागर किनाऱ्याचा विकास आणि सौंदर्यीकरणाचे कामेही होणार आहेत. स्वच्छतागृहे, उपहारगृहे, जेट्टी, ॲम्पी थियटर, लँडस्केपिंग इत्यादी कामे प्रस्तावित आहेत.

CS CamScanner

Scanned with CamScanner

समय भास्कर



# जंजिरे धारावी किला पर मनाया गया 284वाँ विजय दिवस

पंकज दुबे/मीरा-भायंदर

भायंदर पश्चिम स्थित जंजिरे धारावी किला पर 6 मार्च को 284वा विजय दिवस मनाया गया, इस ऐतिहासिक किले को वीर पुरुष चिमाजी अप्पा ने 6 मार्च 1739 को पुर्तगालियों से जीता था। इस ऐतिहासिक जीत की खुशी में बीते 6 मार्च को किला प्रेमियों द्वारा यहाँ पर विजय दिवस मनाया। भायंदर पश्चिम के उत्तन सागरी किनारे पर यह ऐतिहासिक किला मौजूद है, विजय दिवस के अवसर पर शहर के तमाम नामचीन लोगो ने इस स्थल पर अपनी उपस्थिति दर्ज कराई, इस अवसर पर खुद मा. पुष्कर सिंह पेशवा मौजूद थे, जो की पेशवा के 10 वे वंशज है, उन्होंने इस ऐतिहासिक किले पर आकर खुशी जाहिर की उन्हीने कहा की किले के देखभाल के लिए सरकार के साथ-साथ स्थानिक लोगो का भी अहम् योगदान रहता है, जो की यहाँ पर दिख रहा है, यहाँ स्थानिक और सरकार साथ में मिलकर किले के लिए कार्य कर रहे है। आयुक्त दिलीप ढोले ने कहा की यह किला पर्यटक स्थल बनेगा जिसके लिए हम प्रयन्तशील है, साथ की उन्होंने जोर देकर कहा की यहाँ पर आने वालो की संख्या लगातार बढ़ रही है, हम कुछ अंतराल के बाद इस किले पर कार्यकर्म करते रहते है। इस विजय दिवस के अवसर पर यहाँ मा. पुष्कर सिंह पेशवा, विधायक गीता जैन, आयुक्त दिलीप ढोले, पूर्व उप महापौर हसमुख गहलोत, पूर्व नगरसेवक ध्रुव किशोर पाटिल आदि लोग मौजूद थे।

Scanned with CamScanner

MHT
मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, शुक्रवार 10 मार्च 2023

आवश्यकता है

आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार
6.36am 6.25pm
अधिकतम 36°C न्यूनतम 26°C
NSE BSE

# विरार में बेटे ने की अपनी ही मां की निर्मम हत्या, आरोपी गिरफ्तार



**विरार :** विरार पूर्व के फुलपाडा स्तिथ गांधी नगर इलाके के वक्रतुंड अपार्टमेंट का है जहां पर गुरुवार की सुबह की देवांश धनु 26 वर्षीय बेटे ने अपने ही मां की गला घोटकर दबाकर हत्या कर दी। स्थानीय जानकारी मिलते विरार पुलिस ने तत्काल घटनास्थल पहुंचकर शव का जांच पड़ताल कर पोस्टमार्टम के लिए ग्रामीण अस्पताल भेज दिया। घर में बैठे दिमागी रूप से चल रहे बेटे देवांशु को गिरफ्तार कर लिया हैं।

पुलिस सूत्रों द्वारा जानकारी मिली की बीती रात किसी बात को लेकर बेटे और मां के बीच झगड़ा हुआ था जिसके बाद गुस्साए बेटे ने अपनी ही मां की गला दबाकर हत्या कर दी

जानकारी के अनुसार यह वारदात बुधवार सुबह के समय घटी जब देवांश धनु नामक बेटा और उसकी मां वैशाली धनु के बीच झगड़ा हुआ और झगड़े के चलते आरोपी बेटे ने अपनी ही मां की गला घोटकर हत्या कर दी

हालांकि इस झगड़े की जानकारी वैशाली ने पहले ही फोन करके अपनी मां को दे दी थी, जब उसकी मां ने गुरुवार दोपहर घर पर आकर देखा तो दरवाजा बंद पड़ा हुआ था और लाश बेडरूम में पड़ी हुई थी, जिसके बाद मृतक वैशाली की मां ने तुरंत पुलिस स्टेशन में संपर्क कर जानकारी दी जिसके बाद विरार पोलिस स्टेशन की टीम ने आरोपी बेटे को गिरफ्तार कर शव को पोस्टमार्टम के लिए भेज दिया है।

Scanned with CamScanner

मुंबई हिंदमाता टाइम्स

आवश्यकता है

9867 314 765



MHT

# मुंबई हिंदमाता टाइम्स

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

मुंबई, शुक्रवार 10 मार्च 2023

| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| | 6.36am 6.25pm | | अधिकतम 36°C न्यूनतम 26°C | NSE BSE | |


# नशेखोरी बाजार; करोड़ों का माल जब्त

## नालासोपारा ड्रग्स बिक्री का प्रमुख केंद्र बनता जा रहा है

### एनडीपीएस एक्ट क्या है?

एनडीपीएस एक्ट 1985 में बनाया गया था। यह ड्रग्स और तस्करी जैसे अपराधों के खिलाफ सजा का प्रावधान करता है। इस अधिनियम के कई प्रावधानों में केवल अनुमति के साथ चिकित्सा या वैज्ञानिक उद्देश्यों के लिए उपयोग के अपवाद के साथ निर्माण, बिक्री, कब्जे, खपत, दवाओं की तस्करी जैसी गतिविधियां शामिल हैं।

**नालासोपारा (राकेश सिंह) :** नालासोपारा विगत कुछ वर्षों में नालासोपारा ड्रग्स बिक्री का एक प्रमुख केंद्र बन गया है, यह पता चला है कि उच्च समाज से लेकर झुग्गी-झोपड़ियों में बड़े पैमाने पर ड्रग्स की खरीद-फरोख्त होती है। ड्रग माफिया पर नकेल कसने के लिए पुलिस को खासी मशक्कत करनी पड़ रही है। अब तक इन शहरों से करोड़ों रुपए जब्त कर सैकड़ों आरोपितों को जेल भेजा जा चुका है। नालासोपारा में कई जगहों पर ब्राउन शुगर, गांजा, चरस बेचने वाले गिरोह सक्रिय हैं और इन्हें खरीदने के लिए दूर-दूर से युवा नालासोपारा आते हैं। नागरिकों में चर्चा है कि पुलिस ने कई कार्रवाई करने के बाद भी इस पर लगाम लगाने में नाकाम रही है।



### नाइजीरियाई नागरिकों की संख्या बढ़ रही है :

बड़ी संख्या में नाइजीरियाई नागरिक नालासोपारा शहर के पूर्व और पश्चिम दोनों डिवीजनों की पुलिस स्टेशन सीमा के भीतर रहते हैं। कहा जाता है कि सैकड़ों नाइजीरियाई तुलिंज और नालासोपारा पुलिस स्टेशनों के अंतर्गत रहते हैं। आम लोगों में यह भी चर्चा है कि पुलिस प्रशासन द्वारा समय पर कार्रवाई नहीं करने के कारण इनकी संख्या बढ़ रही है। अगर पुलिस ने समय रहते नाइजीरियाई लोगों के खिलाफ सख्त कार्रवाई नही की तो यह भविष्य में पुलिस के लिए सिरदर्द बन जाएगा।

### वर्ष के दौरान 825 मामलों में कार्रवाई की गई, 646 लोगों को गिरफ्तार किया गया :

पिछले साल मीरा भायंदर वसई विरार पुलिस कमिश्नरेट में 825 नशीले पदार्थों का एक टीम ऑपरेशन गठित किया गया था। इस बीच, 609 पुरुष, 17 महिला आरोपी और 20 विदेशी नागरिकों सहित 646 आरोपियों को गिरफ्तार किया गया है।

### कार्रवाई में जब्त की गई कई दवाएं :

साल भर में पुलिस ने 168 किलो गांजा, 3 किलो 859 ग्राम चरस, 50 ग्राम अफीम, 3 किलो कोकीन, 39 किलो एमडी, 8 किलो ब्राउन शुगर बरामद की। साथ ही 8 हजार 208 बोतल गोंग सिरप जब्त किया गया है।

### हर दिन कारवाई जारी :

पुलिस कमिश्नरेट में नशा तस्करों व शराब पीने वालों के खिलाफ प्रतिदिन कार्रवाई की जा रही है।


Scanned with CamScanner

लोकमत

# चोरी, घरफोडी करणाऱ्या पाच आरोपींना अटक

## वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे यश



चोरी, घरफोडीप्रकरणी अटक करण्यात आलेल्या पाच आरोपींसह वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलिस अधिकारी-कर्मचारी.

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : चोरी, घरफोडी करणाऱ्या पाच आरोपींना अटक करण्यात वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या पोलिसांना यश मिळाले आहे. पोलिसांनी आरोपींकडून ११ गुन्ह्यांची उकल करून ५ लाख १२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

चिंचोटी येथील लाइनपाडा परिसरातील मोबाइल रिपेरिंगचे दुकान चोरट्यांनी २७ फेब्रुवारीला फोडण्यात आले होते. चोरट्यांनी दुकानातून मोबाइल व रोख रक्कम चोरी केली होती. सुमित प्रदीप वेखंडे यांनी वालीव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे प्राप्त माहितीच्या आधारे वालीवचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंगलदार यांनी गुन्ह्याचा तपास करून, आरोपी राजेशकुमार देवेंद्र ठाकूर (२८), राज राधेश्याम सिंग (२५), रकीऊल मंटू शेख (२४), श्याम उत्तम राठोड (४०) आणि फकरू मोंहम्मद अली शेख (४७) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या तपासात त्यांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.

या गुन्ह्यातील चोरीस गेलेले मोबाइल, रोख रक्कम, तसेच ११ गुन्ह्यांची उकल करून ५ लाख १२ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त डॉ.शशिकांत भोसले आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलास बर्वे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक (गुन्हे) मिलिंद सावळे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पोलिस हवालदार मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, आदींच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली.

Hello Vasai
Page No. 4 Mar 10, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# मुलानेच केली आईची गळा आवळून हत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारमध्ये एका २६ वर्षीय पोटच्या मुलानेच आपल्या आईची ओढणीच्या साहाय्याने गळा आवळून हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. घटनेची माहिती मिळताच विरार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा करत शवविच्छेदनासाठी पाठवून हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या टीमने आरोपी मुलाला अटक केली आहे.

विरारच्या फुलपाडा येथील गांधीनगर परिसरातील वक्रतुंड अपार्टमेंटमध्ये वैशाली धनू (४४) ही मुलगा देवांश (२६) याच्यासोबत राहत होते. मंगळवारी रात्री मुलगा आणि आईमध्ये काही कारणावरून भांडण झाल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. त्यानंतर गुरुवारी संतापलेल्या मद्यधुंद अवस्थेत मुलाने आपल्याच आईची ओढणीने गळा दाबून हत्या केली आहे. या भांडणाची माहिती वैशालीने तिच्या आईला फोन करून अगोदरच दिली होती. तरी गुरुवारी दुपारी तिची आई घरी आली असता दाराला कुलूप लावून बेडरूममध्ये मृतदेह पडलेला दिसला. त्यानंतर मयत वैशालीच्या आईने तत्काळ ११२ नंबरवर कॉल करून संपर्क साधून ही माहिती दिली. त्यानंतर विरार पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले.

दरम्यान, आई व मुलामध्ये भांडण झाले होते. हाच राग काढून मुलाने ही हत्या केली आहे. आरोपी मुलाला गुन्हा दाखल करून अटक केले आहे, अशी माहिती तुळींज पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी दिली.

Hello Vasai
Page No. 2 Mar 10, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# माझ्या गुंतवलेल्या पैशांचे काय होणार?

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षा पतसंस्था चांगला परतावा देत असल्यामुळे अनेक गुंतवणूकदार पतसंस्थेमध्ये गुंतवणूक करतात; परंतु, वसईतील काही पतसंस्थांची पतच ढासळत चालल्यामुळे गुंतवणूकदारही चिंतेत आहेत.

वसईत अशा शेकडो पतसंस्था आहेत, ज्या अवसायनात निघाल्या आहेत. पतसंस्था अवसायनात काढण्याचा अधिकार सहकार खात्याला असतो. अवसायनात निघाल्यानंतर त्याचे संचालक मंडळ बरखास्त होते. सरकारी लेखापरीक्षक अथवा सहकार खात्यातील कर्मचारी अवसायन म्हणून काम पाहू लागतो. वसईतील अनेक संस्था अवसायनात गेल्या असून ज्या वेळी कागदपत्रांची पूर्तता करतील, त्यानंतरच त्यांचे अवसायनाचे ग्रहण दूर होईल. वसईत काही पतसंस्थानी गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याने स्थानिक पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झालेले आहेत.



## या पतसंस्थांचा पत्ता कोण सांगेल?

पतसंस्थेची नोंदणी निबंधक कार्यालयाकडे झालेली आहे आणि नोंदणीकृत पतसंस्थांच्या आर्थिक प्रकरणाच्या तक्रारी सदस्यांनी केल्या असतील त्याची माहिती सहकार निबंधकाकडे मिळू शकते.

## पैसे अडकून पडले

आमच्या परिसरात नवीन पतसंस्था सुरू झाली होती. घराजवळच बँक असल्यामुळे मी त्यात पैसे जमा केले. मात्र, दोन वर्षांनंतरच बँक बंद पडली. आमचे सगळे पैसे अडकून बसले आहेत.

- फसवणूक झालेला गुंतवणूकदार

## फसवणूक करणाऱ्या पतसंस्थांवर गुन्हा

१ नालासोपाऱ्याच्या वालईपाडा येथील आंचल क्रेडिट को-ऑपरेटिव्ह नावाच्या पतपेढीत रंजना आणि इतरांनी पैसे गुंतवले होते. ते पैसे लोकांना परत न करता कमलेश राय व नागेश मिश्रा यांनी वसईच्या भोयदापाडा येथे जमीन खरेदी करून बांधकाम केले. पेल्हार पोलिसांनी १५ जानेवारी २०२२ मध्ये कमलेश राय, नागेश मिश्रा, ब्रिजदेव सिंग या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

२ आरोपी राजवंत सिंग, यशवंत सिंग, आसाराम मिश्रा, अमित सिंग या चौघांनी संगनमत करून सिंह वाहिनी सहकारी मर्यादित पतसंस्था उघडली होती. यात अनेकांनी पैसे जमा केले होते. मात्र आरोपींनी ही पतपेढी बंद केली. आरोपींनी एकूण ११ लाख ८७ हजार २५० रुपयांची फसवणूक केली आहे. आचोळे पोलिसांनी २५ मे २०२२ मध्ये पतसंस्थेवर गुन्हा दाखल केला आहे.



## काय काळजी घ्यावी?

- कोणत्याही पतसंस्थेत पैसे गुंतवताना त्या संस्थेची, त्याच्या संचालक मंडळाची तसेच त्यांच्या बॅलन्स शीटची माहिती करून घ्यावी.
- मंडळामध्ये कोण आहे, संस्था काय करते, याची विचारपूस करावी, असे आवाहन बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञांनी केले आहे.



Scanned with CamScanner